**महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ**
**भविष्य निर्वाह निधी विश्वस्त मंडळ**

फोन नं. ७३०४६५७६६४
Email Id: cpfadvance@gmail.com
website:www.mahadiscom.in

एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
भविष्य निर्वाह निधी विभाग
धारावी रोड, मांटुगा (पु) मुंबई ४०० ०१९.

क्र.लेवि/भनिनि/उचल प्रदान गट/ D/179

दिनांक : 27 JUN 2024

## परिपत्रक क्र. २३२

मराविंम भनिनि तर्फे परतावा तसेच नापरतावा अग्रीम रक्कमेसाठी मंजूरी देऊन त्याचे आदान कर्मचाऱ्यांना देण्यात येते. परंतु अर्जाचे लेखापरिक्षण करत असताना असे निर्दशनास आले की, मेडिकल कारणासाठी दिलेले मेडिकल सर्टिफिकेट हे सहा महिने किंवा त्याहुन अधिक कालावधीचे असते, तसेच मेडिकल सर्टिफिकेट वर तारीख, नाव किंवा रक्कमे मध्ये बदल करुन त्याची झेरॉक्स अपलोड केली जाते. सदर मेडिकल सर्टिफिकेट वरील खाडाखोड करणे हे चुकीचे असून या प्रकारचे कोणतेही अर्ज मंजूरीसाठी ग्राहय धरले जाणार नाही. याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच वरीष्ठांची सही घेऊनच अर्ज म.रा.वि.भ.नि.नि पोर्टलवर अपलोड करावे. यामध्येही कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांची सही न घेता अर्ज दाखल केलेले निर्दशनास आले. तसेच जून्या पेपरचे झेरॉक्स जोडून अर्ज दाखल केलेले आहे.

नापरतावा अर्जात कर्मचाऱ्यांच्या व वरीष्ठांच्या सहया, तसेच बँक खाते क्रमांक व IFSC कोड हा जोडलेल्या चेक किंवा पासबुक नुसारच असावा यांचे लेखापरिक्षण करुनच पोर्टलवर अर्ज अपलोड करावे व पगाराचे बँक खाते हे लिंक असावे . अर्ज हे मासं विभाग यांच्या कडे एक ते दोन महिन्यांच्या कालावधी करिता प्रलंबित असतात ते लवकरात लवकर भनिनि कार्यालयात पाठवावे जेणेकरुन अर्जदारास निधी मिळण्यास विलंब होणार नाही.

कर्मचाऱ्यांचे अर्ज योग्य परिक्षण करुन , भनिनि पोर्टलवर वेळेत अपलोड करायची जबाबदारी ही स्वत : कर्मचारी व मासं विभाग यांची आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

सचिव

म.रा.वि.मं.भ.नि.नि न्यास